**"जुलै २०२१" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक ५ जुलै २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये कोविड-१९ या संसर्गजन्य महामारीच्या प्रादुर्भावामुळे शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत.
- दिनांक ५ जुलै २०२१ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) मंत्रालय या विभागातील वाहनचालक, गट-क हे पद दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदातून वगळण्यात आले आहे.
- दिनांक ६ जुलै २०२१ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरण २०११ नुसार यशदा, पुणे शिखर संस्था तसेच विभाग व जिल्हा स्तरावर घोषित करण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थांकरिता केंद्र शासनाच्या धर्तीवर ऑनलाईन प्रशिक्षण शुल्काचा दर निश्चित करण्यात आला आहे.
- दिनांक ७ जुलै २०२१ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या अनुषंगाने केंद्र शासनाने दिव्यांगासाठी पदनिश्चितीबाबत प्रसिद्ध केलेल्या यादीनुसार मंत्रालय (खुद्द) तसेच बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील गट-अ ते गट-क मधील पदांवर शारीरिकदृष्टया नि:समर्थ असलेल्या व्यक्तींसाठी सुयोग्य पदे सुनिश्चित करण्यात आली आहेत.
- दिनांक ८ जुलै २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणपत्रे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक ९ जुलै २०२१ च्या शासन निर्णयान्वये कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील बदल्यांसंदर्भात करावयाच्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. चालू वित्तीय वर्षात दिनांक ३१ मे २०२० पर्यंत करावयाच्या सर्वसाधारण बदल्या दिनांक ३१ जुलै २०२० पर्यंत त्या त्या संवर्गातील एकूण कार्यरत पदांच्या १५% एवढया मर्यादेत करण्यात याव्यात.
- दिनांक १२ जुलै २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे कार्यमुल्यमापन अहवाल त्यांच्या पती / पत्नी अथवा जवळच्या नातेवाईकाने प्रतिवेदित / पुर्नविलोकित न करण्याबाबत सूचना आहेत.
- दिनांक १३ जुलै २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ बाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.
- दिनांक १४ जुलै २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या पारिश्रमिकापोटी व भत्त्यांपोटी होणारा खर्च १०-कंत्राटी सेवा या उपशीर्षातून भागविण्याच्या सूचना आहेत.
- दिनांक १४ जुलै २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या तहसिलदार, गट-अ संवर्गातील ६ अधिकाऱ्यांचा परिविक्षा कालावधी संपुष्टात आणण्यात आला आहे.
- दिनांक २९ जुलै २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-३ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ संवर्गातील २ अधिकाऱ्यांचा परिविक्षा कालावधी संपुष्टात आणण्यात आला आहे.

## (ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त

- भारतीय प्रशासन सेवेतील २१ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- सहायक कक्ष अधिकारी -१०३, लिपिक-टंकलेखक-१२७, उच्चश्रेणी लघुलेखक-१५, निम्नश्रेणी लघुलेखक-२ अशा एकूण २४७ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- सहसचिव-१, उच्चश्रेणी लघुलेखक-२ अशा ३ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.

**(ग) <u>नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक</u>**

- उपसचिव संवर्गातील १ अधिकाऱ्याला सहसचिव पदावर, अवर सचिव संवर्गातील २६ अधिकाऱ्यांना उपसचिव पदावर, निवडश्रेणी लघुलेखक संवर्गातील २ कर्मचाऱ्यांना वरिष्ठ स्वीय सहायक पदावर व लघुटंकलेखक संवर्गातील १ कर्मचाऱ्याला निम्नश्रेणी लघुलेखक पदावर अशा एकूण ३० अधिकारी / कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

**(घ) <u>प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>**

- २ अवर सचिवांना प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
- अवर सचिव-१ व निम्नश्रेणी लघुलेखक-१ अशा २ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(च) <u>प्रशिक्षण / परीक्षा</u>**

- दिनांक २६ जुलै २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील लिपिक / लिपिक-टंकलेखक यांची सेवाप्रवेशोत्तर परीक्षा २०२१ ही एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई येथे दिनांक २८ जुलै २०२१ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

**(छ) <u>ज्येष्ठतासूची</u>**

- दिनांक ९ जुलै २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी पात्र सहायक कक्ष अधिकारी यांची दिनांक १ जानेवारी २०२० रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****